दीर्घ सुट्टी विभागामध्ये सेवेत असलेल्या व्यक्तींना देय असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२००६/(२६/०६)/तांशि-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०४ एप्रिल, २००६

संदर्भ : १) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.४ अ/ आस्था/रजा/२००२/८८, दि.८ जानेवारी, २००३ चे पत्र.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-२४९६/२५/सेवा-९, दि.६.१२.१९९६

**शासन परिपत्रक :** दीर्घ सुट्टी विभागामध्ये सेवेत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ अंतर्गत नियम ५४(२)(ए) नुसार कोणत्याही एका वर्षात संदर्भात त्या कर्मचाऱ्याने दीर्घ सुट्टीपैकी काही भागाचा लाभ घेतला असेल तर त्या वर्षाच्या संबंधात त्याला त्याने लाभ न घेतलेल्या भागातील दिवसांचे संपूर्ण दीर्घ सुट्टीचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणात ३० दिवसापैकींची अर्जित रजा घेण्याचा हक्क आहे. तसेच नियम ५४(२)(बी)नुसार जर एखादया वर्षी दीर्घ सुट्टी विभागातील शासकीय कर्मचारी कोणतीही दीर्घ सुट्टी घेत नसेल तर त्याला त्या वर्षाच्या संबंधात नियम ५० अन्वये अर्जित रजा अनुज्ञेय असेल.

२. संदर्भाधीन क्र.२ वरील दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये केंद्रशासनाच्या धर्तीवर शासकीय तसेच जिल्हा परिषद शाळेतील दीर्घ सुट्टी विभागामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक, प्राचार्य, मुख्याध्यापक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक व पाणीवाला यांना म.ना.से. (रजा ) नियम १९८१ मधील नियम ६० अनुसार अनुज्ञेय असलेल्या एकूण २० दिवस अर्धवेतनी रजेपैकी प्रत्येक कॅलेंडर वर्षात १० दिवस अर्जित रजा अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे.

३. यावरुन स्पष्ट होते की, दीर्घ सुट्टी कालावधीत कामावर थोपविल्यामुळे जमा होणारी नियम ५४ नुसारची अर्जित रजा आणि अर्धवेतनी रजेऐवजी उपरोक्त दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय ठरविलेली अर्जित रजा या दोन स्वतंत्र बाबी आहेत. त्यामुळे दीर्घ सुट्टी विभागासाठी नियम ५४ खाली जमा होणारी अर्जित रजा व दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये जमा होणारी अर्जित रजा या दि.१.१.१९९७ पासून स्वतंत्रपणे दाखविणे आवश्यक आहे. दीर्घ सुट्टी विभागातील कर्मचाऱ्यांना नियतवयोमानानुसार सेवानिवृत्ती अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती नंतर नियम ५४ अंतर्गत जमा होणाऱ्या अर्जित रजेचे अंतिम रजा रोखीकरण अनुज्ञेय आहे. तथापि दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये अर्धवेतनी रजेऐवजी अनुज्ञेय ठरविण्यात आलेली अर्जित रजा हीच मुळात भरीव सवलत असल्याने, त्यांचे रजा रोखीकरण सममुल्य अनुज्ञेय नाही.

४. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, तसेच अनुदानित संस्थांतील शिक्षकीय पदांचा समावेश दीर्घ सुट्टी विभागामध्ये होतो. सदर संस्थांतील ज्या व्यक्ती नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्त होतात त्यांच्या अर्जित रजेचे वर्गीकरण वरील परिच्छेद ३ मध्ये केल्याप्रमाणे न करता अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय ठरविण्यात येते. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे फक्त नियम ५४ खाली जमा होणाऱ्या अर्जित रजेचे रोखीकरण अनुज्ञेय असल्याने दि.१.१.१९९७ पासून ज्या अध्यापकांच्या अर्जित रजेचे वर्गीकरण न करता (नियम ५४ खाली जमा होणारी अर्जित रजा व दि.६.१२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये जमा होणारी अर्जित रजा) रोखीकरण अनुज्ञेय करण्यात आले आहे, त्यांच्याकडून दि.६.१२.१९९६ न्वये जमा झालेल्या अर्जित रजा रोखीकरणापोटी देय केलेली जादा रक्कम प्रदान केली असल्यास वसूल करण्यात यावी. तसेच ज्या व्यक्तींना निवृत्तीनंतर नियम ५४ खाली जमा झालेल्या अर्जित रजेचे रोखीकरण अनुज्ञेय ठरविण्यात आलेले नाही त्या व्यक्तींना नियम ५४ खाली जमा झालेल्या अर्जित रजेचे रोखीकरण मंजूर करण्यात यावे.

५. सदर परिपत्रक वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.६०/०६/सेवा-८, दि.२२.३.२००६ न्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.गो.खडपकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / अनुदानित महाविद्यालये (संचालकांमार्फत )
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई /नागपूर
कार्यासन, तांशि-४, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
निवडनस्ती / तांशि-३